**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९१ । गुरुवार २० ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# बालविवाह लावल्या प्रकरणी कर्जतमध्ये नवरदेव, भटजीसह ४० जणांवर गुन्हा

## आरोपींमध्ये वधू-वराच्या आई-वडिलांसह विवाहास उपस्थित नातेवाईकांचा ही समावेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अल्पवयीन मुलीचा विवाह लावल्याप्रकरणी नवरदेव, त्याचे आई-वडील, मुलीचे आई-वडील, लग्न लावणारा भटजी यांच्यासह विवाहास उपस्थित असलेल्या सुमारे ३० ते ४० जणांवर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील वायसेवाडी येथील चैतन्य मंगल कार्यालयात १५ ऑगस्ट रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास एका अल्पवयीन मुलीचा विवाह लावण्यात आला. मुलगी अल्पवयीन व कायद्याने विवाहासाठी अपात्र असल्याचे माहीत असतानाही हा विवाह पार पडल्याने, कर्जत पोलीस ठाण्यात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या कलम ९, १० आणि ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ग्रामविकास अधिकारी शुभम गौतम घोडके (वय ३०) यांनी तक्रार दिली आहे. या गुन्ह्यात मुलीचे आई-वडील, नवरदेव व त्याचे आई-वडील, लग्न लावणारे पुरोहित (भटजी) आणि उपस्थित ३० ते ४० नातेवाईकांवर कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक काटे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



### पोलिसांचे आवाहन

कर्जत पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात कुठेही बालविवाह होत असल्यास त्वरित कर्जत पोलिसांच्या ०२४८९-२२२३३३ या क्रमांकावर किंवा आपत्कालीन डायल ११२ वर संपर्क साधून माहिती द्यावी. तसेच, यापुढे बालविवाहास उपस्थित राहणाऱ्या नातेवाईकांवरही कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विकणाऱ्या १४ जणांवर गुन्हे

## एलसीबीची नगर शहर व जामखेडमध्ये कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रेत्यांविरुद्ध राबविलेल्या मोहिमेत जामखेड आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४ ठिकाणी छापे टाकून १४ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत एकूण ७३ हजार ७६६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड आणि पोलीस अंमलदारांच्या दोन पथकांनी १९ आणि २० ऑगस्ट रोजी ही कारवाई केली.

जामखेड येथील पहिल्या कारवाईत शरद पुंडलीक शिंदे (वय २१, रा. खर्डा) याला ताब्यात घेतले, तर तुषार राळेभात, सार्थक राळेभात व राजू घोडके (दोघे रा. जामखेड) हे फरार झाले. दुसऱ्या कारवाईत सुधीर अंकुश कोल्हे (वय ४९, रा. कोल्हेवाडी) त्याला ताब्यात घेण्यात आले, तर तुषार राळेभात व राजू घोडके फरार आहेत. तिसऱ्या कारवाईत समीर रशीद सय्यद (वय १९, रा. जामखेड) यास अटक करण्यात आली असून फैयाज तांबोळी ■ पान ४ वर

# नगर-मनमाड आणि ट्रम्प विधानावर डॉ.सुजय विखे पाटील ठाम!

## विरोधकांना थेट प्रत्युत्तर, पुराव्यांसह मांडली भूमिका



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर मी ठाम आहे. अभ्यासू पणे केलेले हे वक्तव्य विरोधकांना न समजल्याने व तेवढा अभ्यास त्यांचा नसल्याने राजकीय पोळी भाजण्यासाठी ते रान उठवत आहे या प्रश्नावर मला विरोधकांना उत्तर देण्याची गरज नाही परंतु जनतेला उत्तर देणे माझे दायित्व आहे. रस्त्याच्या कामांना युद्धजन्य परिस्थिती व डोनाल्ड ट्रम्प हेच जबाबदार असल्याचे वक्तव्यावर मी आजही ठाम असल्याचा पुनर्रचार करत दारू पिणाऱ्यांची संख्या वाढली हे वक्तव्य मी मार्मिक व मिश्किल पणे केले होते याचा अर्थ काहींनी वेगळा काढला आहे हे मिस्कील वक्तव्य मी मागे घेत असल्याचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती या पत्रकार परिषदेत शिर्डी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते राजेंद्र गोंदकर यांच्यासह नगर परिषदेच्या नगरसेविका व नगरसेवक उपस्थित होते याप्रसंगी बोलताना डॉ सुजय विखे पाटील म्हणाले की अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कार्यपद्धतीमुळे युद्ध लादल्याने डांबराची उपलब्धता व आयात कमी झाली डांबर आयातीवर संकट आले त्यामुळे देशातील अनेक रस्त्यांची कामे थांबली त्यात अहील्यानगर मनमाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुद्धा संथ गतीने होत आहेत अमेरिकेच्या युद्ध धोरणामुळे पश्चिम आशियातून डांबराचा पुरवठा घटला, दर वाढले आणि त्याचा परिणाम देशातील रस्त्यांच्या कामांवर झाला,' या आपल्या आधीच्या वक्तव्यावर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील ठाम राहिले आहेत. 'मी प्रत्येक वाक्य पूर्ण अभ्यास करून बोलतो. माझ्या वक्तव्याला अधिकृत आकडेवारी, शासकीय पत्रे आणि परदेशी व भारतातील विविध वृत्तपत्रांतील वृत्तांचे आधार आहेत. त्यामुळे मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून

■ पान ४ वर

# धनगरवाडीत सव्वातीन लाखांचा गांजा जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील धनगरवाडी येथे घरासमोर अवैधपणे गांजाची लागवड करणाऱ्या ठिकाणावर एमआयडीसी पोलिसांनी छापा टाकून ३ लाख २३ हजार ६५० रुपये किमतीचा तब्बल ६४.७३ किलोग्रॅम गांजा जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना धनगरवाडीतील एका घरासमोर गांजाची झाडे लावल्याची माहिती मिळाली होती. त्यांच्या आदेशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या पथकाने १९ ऑगस्ट रोजी संबंधित ठिकाणी छापा टाकला.


पोलीस पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असता, तिथे अवैध गांजाची लागवड केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलिसांनी अनिल लक्ष्मण वीरकर (वय ४९, रा. धनगरवाडी) यास ताब्यात घेतले आहे. आरोपीविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम २०(अ) आणि २०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी शिरीष वमने, सपोनि माणिक चौधरी, पोसई अमोल गर्जे, अजय कौटे, सुदाम लोंढे, सुशांत दिवटे, सचिन हरदास, उमेश शेरकर, सुरज देशमुख आणि अक्षय रोहोकले यांच्या पथकाने केली.



## दै. आकर्षण निवडक

### शेतकरी योद्धा दशरथ सावंत यांना 'शेतकऱ्यांचा आसूड' सन्मान



अहिल्यानगर- महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दीच्या निमित्ताने आणि 'विषमता निर्मूलन निर्धार वर्षा'च्या औचित्याने अकोले तालुका राष्ट्र सेवा दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी योद्धा मा. दशरथ सावंत यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' सन्मान सोहळ्याला राज्यातील ज्येष्ठ शेतकरी नेते मा. खासदार राजू शेट्टी, साहित्यिक व माजी आय.ए.एस. अधिकारी मा. लक्ष्मीकांत देशमुख तसेच राष्ट्र सेवा दलाचे राज्य अध्यक्ष मा. राजा कांदळकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. त्यामुळे अकोलेच्या सामाजिक, वैचारिक आणि परिवर्तनवादी चळवळीच्या दृष्टीने हा सोहळा विशेष महत्त्वाचा ठरणार असून शेतकरी, शिक्षक, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक आणि फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता अगस्ती महाविद्यालय, अकोले येथील के. बी. दादा देशमुख सभागृहात हा सोहळा संपन्न होणार आहे. अकोले तालुका राष्ट्र सेवा दलाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या माध्यमातून शेतकरी-कष्टकरी समाजाच्या प्रश्नांना वैचारिक व्यासपीठ देण्याचा आणि परिवर्तनवादी विचारांना नवी ऊर्जा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.'शेतकऱ्यांचा आसूड' सन्मानातून शेतकरी संघर्षाचा गौरव - महात्मा फुले यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन आणि वंचित समाजाच्या प्रश्नांना आपल्या विचारांच्या केंद्रस्थानी ठेवून अन्यायाविरुद्ध संघर्षाची वैचारिक मशाल पेटवली. त्याच परिवर्तनवादी विचारपरंपरेचा जागर करत शेतकरी योद्धा दशरथ सावंत यांच्या शेतकरी-कष्टकरी समाजासाठीच्या कार्याचा 'शेतकऱ्यांचा आसूड' या सन्मानाने गौरव करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या कार्यकर्त्याचा सन्मान हा केवळ व्यक्तीचा गौरव नसून शेतकरी संघर्ष, श्रमसंस्कृती आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा सन्मान असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे. राजू शेट्टींच्या उपस्थितीने शेतकरी प्रश्नांना मिळणार वैचारिक बळ- ज्येष्ठ शेतकरी नेते मा. खासदार राजू शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यात शेतकरी प्रश्न, शेतीचे अर्थकारण, ग्रामीण समाजजीवन, शेतमालाला योग्य भाव, शेतकऱ्यांचे हक्क आणि सामाजिक विषमता या प्रश्नांना व्यापक संदर्भ मिळण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमाच्या शुभहस्ते मा. सुशीलाताई दादासाहेब रूपवते उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. लक्ष्मीकांत देशमुख माजी आय.ए.एस. अधिकारी तथा ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, मा. वैभवराज पिचड महाराष्ट्र राज्य विधानसभेचे सदस्य व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाचे संचालक, तसेच मा. राजा कांदळकर राज्य अध्यक्ष, राष्ट्र सेवा दल, महाराष्ट्र हे उपस्थित राहणार आहेत.

### चौक सुशोभीकरण व बंदिस्त जिमचे उद्घाटन

अहिल्यानगर- सिव्हिल हडको परिसरातील गणेश चौकाच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले असून, सूर्या



फाउंडेशन महाराष्ट्र राज्य ट्रस्टचे अध्यक्ष व शिवसेना ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत काका शेळके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि महानगरपालिकेच्या विकास निधीतून चौकाला आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण रूप प्राप्त झाले आहे. चौकाच्या सुशोभीकरणासोबतच पाणी बचतीचा संदेश देणाऱ्या आगळ्यावेगळ्या लोगोचे अनावरण तसेच परिसरातील तरुणांसाठी आधुनिक साधनांनी सुसज्ज बंदिस्त व्यायामशाळेचे उद्घाटन महानगरपालिकेचे सफाई कामगार आणि प्रभागातील सर्व नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. गणेश चौकाचे सौंदर्य वाढावे, परिसराला एक नवी ओळख मिळावी आणि नागरिकांसाठी उपयुक्त सुविधा निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने चंद्रकांत काका शेळके यांनी महानगरपालिकेकडे विशेष निधीची मागणी करून सातत्याने पाठपुरावा केला. निधी मंजूर झाल्यानंतर चौकाचे सुशोभीकरण करण्यात आले. या सुशोभीकरणात तयार करण्यात आलेला पाणी बचतीचा लोगो विशेष आकर्षण ठरला आहे. लोगोमध्ये दोन हातांच्या मध्यभागी पाण्याचा थेंब पडताना दाखविण्यात आला आहे. निसर्गातील पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान असून, तो जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, असा संदेश या लोगोच्या माध्यमातून देण्यात आला आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' तसेच पाणी बचतीचा संदेश देणाऱ्या या संकल्पनेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध केल्याने अनेकांचे जीवन सुखकर - विक्रम पाठक

## दिल्लीगेट पटांगण येथे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेत्र तपासणी व संधिवात शिबिर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिल्लीगेट पटांगण येथे मोफत नेत्र तपासणी आणि संधिवात शिबिराचे आयोजन करण्यात आले.

धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. तसेच अचानक उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांसाठी होणारा औषधोपचाराचा खर्च परवडत नसल्याने अनेकजण उपचाराकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत या शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून दिल्याने अनेक रुग्णांना मोठा लाभ झाला.

''शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्याने अनेकांचे जीवन सुखकर होत आहे,'' असे प्रतिपादन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले.उद्घाटन आणि सुविधा भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट पटांगण, अहिल्यानगर आणि स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले. शिबिरात मोफत संधिवात तपासणी, नेत्र तपासणी तसेच अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तगट आणि तपासणीची सुविधा देण्यात आली.

सुरुवातीला श्री जिव्हेश्वर भगवान यांचे पूजन करण्यात आले.यानंतर शिबिराचे उद्घाटन नेत्रतज्ञ डॉ. आदित्य खडामकर आणि संधिवात व सांधेरोग तज्ज्ञ डॉ. अदिती पाटणकर-देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

उपस्थिती - याप्रसंगी विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, विश्वस्त संजय सागावकर, खजिनदार गजेंद्र सोनवणे,सचिव विजय मानकर,उत्सव समितीचे प्रमुख नीरज चांगटे,राजेंद्र गर्जे,बबन शेख,मुकुंद सावेकर,अंबादास बडे, स्वकुळ साळी महिला मंचच्या अध्यक्ष छाया साळी, वनिता पाटेकर, वनिता मानकर, विद्या मानकर, मनीषा खडामकर, सायली खडामकर यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. गरजूंची सेवा हाच उद्देश

विश्वस्त संजय सागावकर म्हणाले, ''दरवर्षी भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना सेवा देणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे. या शिबिराला समाजातून दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.''कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबन शेख यांनी केले तर आभार सचिव विजय मानकर यांनी मानले.

# संत भगवानबाबा मल्टिस्टेट प्रकरणात लुनिया यांच्यासह संबंधितांवर एम.पी.आय.डी. अंतर्गत कारवाईची मागणी

## फरार संचालकांना संरक्षण दिल्याच्या आरोपांची चौकशी करा; मालमत्ता जप्त करून ठेवीदारांचे पैसे परत करण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट प्रकरणातील संतोष प्रकाश लुनिया, संबंधित संचालक तसेच तपासात दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींवर एम.पी.आय.डी. कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा ठेवीदारांचे प्रतिनिधी प्रकाश पोटे आणि गणेश शेकडे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना देण्यात आले.यावेळी प्रतीक बडे, रामराव नगरे, रामदास बडे, बंडू वरदे रवींद्र नजन आदीसह सर्व संबंधित ठेवीदार उपस्थित होते.

या प्रकरणात अनेक ठेवीदारांनी प्रकाश पोटे यांच्याकडे लेखी तक्रारी व निवेदने दिली असून, त्यांच्या अर्जांच्या आधारे हे निवेदन साद करण्यात आले आहे. यापूर्वी १७ जुलै २०२६ रोजी पोलीस प्रशासनाकडे सविस्तर निवेदन देऊन कथित सहा कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहारांसह जमीन व्यवहार व इतर आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. संतोष प्रकाश लुनिया यांनी भगवानबाबा मल्टिस्टेटमधील फरार आरोपी संचालकांना लपवून ठेवले किंवा संरक्षण देऊन मदत केली असल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. तसेच आरोपींना विविध आर्थिक व्यवहारांमध्ये मदत झाली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे लुनिया यांची भूमिका तपासाच्या दृष्टीने महत्त्वाची असून, कायदेशीर प्रक्रियेनुसार त्यांची चौकशी करून सहभाग निष्पन्न झाल्यास सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

अनेक ठेवीदारांनी लुनिया यांच्या सांगण्यावरून भगवानबाबा मल्टिस्टेटमध्ये ठेवी ठेवल्याचे लेखी अर्ज दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनी ठेवीदारांना संस्थेत पैसे ठेवण्यास प्रवृत्त करणाऱ्या एजंटसदृश व्यक्तीची भूमिका बजावली होती का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच लुनिया यांनी भगवानबाबा मल्टिस्टेटच्या संबंधित संचालकांकडून खरेदी केलेल्या जमीन व्यवहारांचीही सखोल तपासणी करावी. हे व्यवहार सामान्य खरेदी-विक्रीचे होते की फरार संचालकांना वाचविण्यासाठी अथवा त्यांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी करण्यात आले होते.

# दिवंगत चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या स्मृति जपण्यासाठी भरीव कार्य करूया - माजी आमदार लहू कानडे




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवंगत चित्रकार श्रीधर अंभोरे स्नेह परिवार च्या वतीने स्टेशन रोडवरील ग्रामीण विकास अभ्यास व संशोधन केंद्राच्या सभागृहात आयोजित अभिवादन सभा आयोजन करण्यात आले होते.

या वेळी बोलताना सुप्रसिद्ध कवी माजी आमदार लहू कानडे यांनी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार दिवंगत श्रीधर अंभोरे यांच्या स्मृती चिरंतन टिकविण्यासाठी सर्वांनी मिळून कार्य करूया असे आवाहन केले.यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध शिल्पचित्रकार प्रमोद कांबळे ज्येष्ठ कवी प्रकाश घोडके ,ज्येष्ठ पत्रकार सतीश दरेकर, संजय दळवी, मयूर भुजबळ, पुष्कर वाघ , विकी धारणकर, भाऊसाहेब थोरात, विकास कांबळे, ज्योती डेरेकर, तारा सातपुते, अर्जुन कांबळे, कवित्री संजीवनी बालसिंग ,मकरंद घोडके,प्राजक्ता गिरमकर, शहाजी सय्यद, अविनाश पडवळ, बालाजी बल्लाळ, राहुल गिरमकर,शब्दगंधाचे सुनील गोसावी, भगवान राऊत यांच्यासह लेखक कवी चित्रकार व साहित्य रसिक उपस्थित होते.

व्यंगचित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या आठवणींना उजाळा देताना माजी आमदार लहू कानडे म्हणाले, की श्रीधर अंभोरे यांनी आयुष्यभर परिवर्तनवादी व प्रागतिक विचारावर अमर्याद प्रेम केले ते नेहमी म्हणायचे की तथागत भगवान गौतम बुद्ध सांगून गेले की आपण इतके सुंदर जगलं पाहिजे की आपल्या मृत्यूचाही उत्सव झाला पाहिजे चित्रकार श्रीधर अंभोरेंच्या मृत्यूनंतर त्यांचा उत्सव सगळीकडे साजरा होतोय.

अंभोरेंनी जे जे सितारलं ते व्यक्त होऊन झाल्यानंतर त्यांच्याकडे काहीही पुरावा ठेवत नसत मात्र त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या स्नेहीजनांनी लेखक कवी चित्रकारांनी त्यांचा हा चिरंतन आणि ऐतिहासिक ठेवा जपला पाहिजे अंभोरे यांची समज खूप मोठी होती. त्यांच्यासोबत च्या पन्नास वर्षाच्या आयुष्यातील मैत्रीच्या खूप आठवणी होत्या त्यावर एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकेल अंभोरे कोणाचीही हुबेहूब नक्कल करत असत माझ्या अनेक पुस्तकांची मुखपृष्ठ त्यांनी चितारली समाजासाठी ऋण फेडण्याची दानत चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्यामध्ये होती. अलीकडच्या काळात जातीय उमेदवार फार वाढला आहे

# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे मेगा क्रेडिट आउटरीच कॅम्प उत्साहात

## महिला बचत गट व कृषी पूरक उद्योगांसाठी १५ कोटी रुपयांच्या कर्जाचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने देशभरात आयोजित करण्यात येत असलेल्या मेगा क्रेडिट आउटरीच प्रोग्राम अंतर्गत दुर्गम भागातील शेतकरी ,महिला बचत गट व कृषी पूरक उद्योग व्यवसाय वाढीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने अकोले तालुक्यात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बँकेच्या विविध कृषी व व्यवसाय कर्जयोजनांच्या माध्यमातून सुमारे १५ कोटी रुपयांच्या कर्जाचे वाटप करून मंजुरी देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सोराबजी पोचखानवाला यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रजलाने करण्यात आली . यावेळी बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे,कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे,आत्माचे प्रकल्प संचालक रप्रदीप लाटे,अकोल्याचे गट विकास अधिकारी,अमर माने,जिल्हा लीड मॅनेजर रितेश वाकोडे,पंकज देशमुख ,अतुल पवार ,उम्मेद चे कुंदन कोराडे, प्रगतशील शेतकरी राम तळेकर,चंद्रशेखर घोडेकर, भाऊसाहेब वाघ, आदींसह महिला बचत गटाच्या सदस्या, शेतकरी, बँक कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माहिती देताना अहिल्यानगर क्षेत्राचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी सांगितले की बँकेच्या या उपक्रमाला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून कार्यक्रमास महिला बचत गटांचा व ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आउटरीच कार्यक्रमाद्वारे बँकेला ५२ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या कर्जाचे अर्ज (लीड्स) प्राप्त झाले. ज्यापैकी १५ कोटी रुपयांचे कर्ज वितरित व मंजूर करण्यात आले आहे.महिला सक्षमीकरण आणि कृषी योजनांवर बँकेचा भर असून महिला बचत गटांना स्वावलंबी बनवण्यासाठी व महिला सक्षमीकरणासाठी कर्जरूपी आर्थिक मदत बँकेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येते बँकेच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त शेतकरी, महिला बचत गट व ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन नरेश कुमार दुबे यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात जिल्हा लीड मॅनेजर रितेश वाकोडे म्हणाले की ग्रामीण भागातील शेतकरी बांधव आणि महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने प्रयत्न करत आहोत. आदिवासी व मागास भागातील शेतकरी आणि महिला बचत गटांना आर्थिक प्रवाहात आणणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे ते म्हणाले.

जिल्हा परिषद कृषी विभागाचे जिल्हा विकास अधिकारी सुधीर शिंदे. व कृषी विभागाचे आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे म यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, बचत गट आणि महिला भगिनींचा आर्थिक स्तर उंचावणे व त्यांना स्वावलंबी बनवणे या मुख्य उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने दुर्गम भागातील शेतकऱ्यांसाठीअकोले येथे विशेष मार्गदर्शन शिबिरा मुळे शेतीपूरक उद्योगांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास यांनी व्यक्त केला.

# समृद्ध जीवनाची कला वाचनातून घडते - उद्योजक रवींद्र मुळे

## जिल्हा वाचनालयाच्या निबंध व चित्रकला स्पर्धेत धिरडे, शिंदे, अमृते ,बिडकर ,बोल्ली अव्वल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ज्या काळात जगाला वाचन, लिखाण, लिपी या गोष्टी अज्ञात होत्या त्या काळात आपल्या ऋषीमुनींनी ग्रंथांच्या माध्यमातून अजरामर असे साहित्य निर्माण केले ,आम्ही या दैवित्यमान संस्कृतीचे पाईक आहोत याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान असायला हवा. आपल्या देशात क्रांती करणारे अनेक महापुरुष हे वाचनातून, साहित्यातून घडले. आपली सुप्त मनशक्ती, कल्पनाशक्ती आणि खऱ्या अर्थाने ''समृद्ध जीवनाची कला'' ही वाचनातून निर्माण होते असे प्रतिपादन उद्योजक इंजिनियर व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मुळे यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त निबंध स्पर्धा, स्वातंत्र्यदिनानिमित्त चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष




डॉ. राजेंद्र ठाकूर ,उपाध्यक्ष दिलीप पांढरे सहकार्यवाह राहुल तांबोळी संचालक किरण आगरवाल ,शिल्पा रसाळ, प्रा.ज्योती कुलकर्णी, ग्रंथपाल अमोल इथापे स्पर्धेचे परीक्षक स्वाती रानडे ,डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, चित्रकला स्पर्धेचे परीक्षक प्रशांत शेकटकर सर प्रवीण साळुंखे सर आदींसह स्पर्धेतील विजेते आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना मुळे यांनी आजच्या एआय च्या जमान्यात तुम्हाला माहिती खूप मिळू शकेल परंतु खरे ज्ञान मिळवायचे असेल तर तुम्हाला पुस्तक वाचण्याशिवाय पर्याय नाही स्पर्धेच्या माध्यमातून चांगले लेखक कलाकार व संवेदनशील अशी पिढी घडणार असून त्यासाठी आपल्याला वाचनाची भूक सतत वाढती ठेवावी लागेल अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली.

प्रास्ताविकात डॉ. राजेंद्र ठाकूर यांनी अहिल्यानगर जिल्हा वाचनालय वाचन संस्कृती वाढवणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देऊन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना एक वर्षाचे मोफत सभासदत्व देणार असल्याचे जाहीर केले.

निबंध स्पर्धेच्या परीक्षका स्वाती रानडे आणि चित्रकला स्पर्धेचे परीक्षक प्रवीण साळुंखे यांनी स्पर्धेविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालिका शिल्पा रसाळ, स्वागत प्रा. ज्योती कुलकर्णी तर आभार किरण आगरवाल यांनी मानले. यावेळी स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले या स्पर्धेला नगर जिल्ह्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला स्पर्धा यशस्वी होण्यासाठी वाचनालयाचे सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारतात पल्लवी कुक्कडवाल ,सौ वर्षा जोशी श्री संजय गाडेकर, आतिष तरोटे, सिकंदर शेख आदींचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

# शिल्पांच्या माध्यमातून प्रबोधन अन् शहराच्या सौंदर्यात भर; अहिल्यानगरच्या चौकांचे बदलते रूप

### ‘माझी वसुंधरा’ अभियानातून विविध चौकांचे सुशोभीकरण; आकर्षक शिल्पे ठरताहेत नगरकरांच्या आकर्षणाचे केंद्र






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून ‘माझी वसुंधरा’ अभियानांतर्गत शहरातील विविध चौकांचे सुशोभीकरण करण्यात येत असून, विविध विषयांवर आधारित आकर्षक शिल्पांच्या माध्यमातून विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण,पर्यावरण, स्वच्छता, सामाजिक संदेश आणि नागरिकांमध्ये जनजागृतीचे काम केले जात आहे. या शिल्पांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली असून, शहरातील प्रमुख चौकांना नवे आकर्षक रूप प्राप्त झाले आहे.

अहिल्यानगर शहराची विकासकामांच्या माध्यमातून खेड्याची ओळख पुसत आता विकसित शहराच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरातील विविध विकास प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, रस्ते, पथदिवे, महापालिकेचे हॉस्पिटल, क्रीडा संकुल, बसस्थानक यांसह विविध विकासकामांना गती मिळाली आहे. विकासकामांसोबतच शहराचे सौंदर्य वाढविण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकेच्या माध्यमातून ‘माझी वसुंधरा’ अभियानांतर्गत शहरातील विविध चौकांमध्ये आकर्षक शिल्पे उभारण्यात आली आहेत. या शिल्पांमधून पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, जलसंवर्धन तसेच सामाजिक जबाबदारीचे संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. त्यामुळे ही शिल्पे केवळ चौकांचे सौंदर्य वाढविणारी ठरत नसून, नागरिकांमध्ये प्रबोधनाचे प्रभावी माध्यमही बनली आहेत.

बुरुडगाव रोड, साईनगर, वाकोडी रोड, नामदे चौक, पाऊलबुद्धे शाळा परिसर, पारिजात चौक, शीला विहार चौक, रासनेनगर चौक आणि गंगा उद्यान चौक आदी भागांमध्ये उभारण्यात आलेली शिल्पे सध्या नगरकरांच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहेत. या शिल्पांमुळे चौकांचे स्वरूप बदलले असून, शहरात प्रवेश करणाऱ्या नागरिकांचेही लक्ष वेधले जात आहे.

शहराचा विकास हा केवळ रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न राहता शहराचे वातावरण सुंदर, स्वच्छ आणि नागरिकांना आनंददायी असावे, यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध चौकांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. आकर्षक शिल्पांमुळे शहरातील प्रमुख चौकांना एक वेगळी ओळख मिळत असून, शहराच्या सौंदर्यातही लक्षणीय भर पडत आहे.

शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेली ही शिल्पे नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून, भविष्यात शहरातील पर्यटनाच्या दृष्टीनेही ती महत्त्वाची ठरू शकतात. चौकांचे सुशोभीकरण, आकर्षक शिल्पे, स्वच्छ परिसर आणि हरित वातावरण यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होत आहे. त्यामुळे विकासकामांसोबतच शहराचे सौंदर्य आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे.

विकासकामांना गती, चौकांचे सुशोभीकरण आणि शिल्पांच्या माध्यमातून जनजागृती, या त्रिसूत्रीमुळे अहिल्यानगर शहराला अधिक आकर्षक आणि आधुनिक स्वरूप प्राप्त होत असून, शहराच्या बदलत्या रूपाची नागरिकांमध्येही चर्चा होत आहे.

## दै. आकर्षण निवडक

### भुईकोट किल्ल्यावर वृक्षारोपणाने स्वातंत्र्यदिन साजरा; सामाजिक कार्यकर्त्यांचा अनोखा उपक्रम




अहिल्यानगर- देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीचा उत्साह विविध उपक्रमांतून व्यक्त होत असताना, अहिल्यानगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भुईकोट किल्ला परिसरात वृक्षारोपण करून स्वातंत्र्यदिन साजरा केला. सामाजिक कार्यकर्ते तथा ‘वृक्ष मित्र’ विजय भालसिंग यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या परिसरात वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली. वडाचे झाड हे भारतीय संस्कृतीत दीर्घायुष्य, स्थैर्य आणि निसर्गाशी असलेल्या नात्याचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने वडाची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. विजय भालसिंग आणि शासनाचा पुरस्कार प्राप्त डॉ. सुनील सकट यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मानवी हक्क अभियानचे अशोक भोसले, माजी प्रा. डॉ. विजयकुमार पोटे, किरण शेरकर, माजी सैनिक शिवाजी गायकवाड, तनमय नागपुरे, राजेंद्र नागपुरे आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते तथा वृक्ष मित्र विजय भालसिंग म्हणाले की, ‘‘आपल्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी सुरक्षित आणि हिरवाईने नटलेला देश निर्माण करण्याचा संकल्प करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. केवळ वृक्षारोपण करून आपली जबाबदारी संपत नाही, तर लावलेले प्रत्येक झाड जगविणे ही खरी जबाबदारी आहे. झाडे आपल्याला प्राणवायू, सावली, फळे आणि पर्यावरणाचा समतोल देतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या आयुष्यात किमान काही झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करावा.’’‘‘भुईकोट किल्ला हा आपल्या इतिहासाचा महत्त्वाचा ठेवा आहे.

### ‘इंडिया अगेंस्ट कुमन धारणालय’ अभियानाची २८ ऑगस्टला घोषणा

अहिल्यानगर - समाजातील स्वार्थ, जातीय विषमता, धार्मिक द्वेष आणि हिंसक प्रवृत्तींना वैचारिक पातळीवर आव्हान देण्यासाठी ‘इंडिया अगेंस्ट कुमन धारणालय’ या देशव्यापी मोहिमेची घोषणा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट व्यक्तीविरोध नसून, समाजात खोलवर रुजलेल्या विघातक मानसिक प्रवृत्तींना वैचारिक आव्हान देऊन त्यामध्ये परिवर्तन घडविणे हे आहे. आयोजकांच्या मते, ‘कुमन’ हा शब्द कोणत्याही धर्म, जात किंवा समुदायाविरुद्ध नसून तीन प्रकारच्या विघातक मनोवृत्तींचे प्रतीक आहे. यामध्ये ‘कु’ म्हणजे कुरु, कौरव,स्वार्थी प्रवृत्ती सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा केवळ स्वतः कडे किंवा संकुचित गटाकडे केंद्रित करण्याची मानसिकता; ‘म’ म्हणजे मनुवादी प्रवृत्ती जन्माच्या आधारावर उच्च-नीच सामाजिक व्यवस्था आणि विषमता टिकवून ठेवण्याची मानसिकता; तर ‘न’ म्हणजे नथूराम,द्वेषमूलक व हिंसक प्रवृत्ती संवाद, लोकशाही आणि अहिंसेऐवजी द्वेष व हिंसेकडे झुकणारी मानसिकता, अशी मांडणी करण्यात आली आहे.

### नसीम शेख यांचे निधन

अहिल्यानगर - फकीरवाडा रोड येथील रहिवासी



नसीम उस्मान रावसाहेब शेख (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नसीम शेख या धार्मिक, मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनानंतर लाल टाकी येथील जलाल शाह बुखारी कब्रस्तान येथे त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नसीम शेख या पाटबंधारे विभागाचे निवृत्त अभियंता शेख उस्मान रावसाहेब यांच्या पत्नी होत. सामाजिक कार्यकर्ते फरमान व इरफान यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांसह फकीरवाडा परिसरात शोककळा पसरली आहे.

## श्री ढोकेश्वर विद्यालयात ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा

### शहिदांच्या त्यागाचे स्मरण करावे – सिताराम खिलारी पा.



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय, टाकळी ढोकेश्वर. या विद्यालयात, भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. सितारामजी खिलारी पा. तथा अण्णा यांनी ध्वजारोहण केले. ध्वजारोहणानंतर मा. खिलारी यांनी आपल्या भाषणातून सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या व पुढे सांगितले की, भारतातील शूरवीरांनी व क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. विद्यार्थ्यांनी शहिदांच्या त्यागाचे स्मरण करावे. आजचा दिवस त्यांचे स्मरण करण्याचा व त्यांना अभिवादन करण्याचा आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण मोकळा श्वास घेऊ शकत आहोत.

ध्वजारोहणानंतर विद्यालयातील ज्युनिअर कॉलेजचे समन्वयक प्रा. अशोक गांगड यांनी सर्व विद्यार्थ्यांना साक्षरतेची, कॉपीमुक्ततेची व तंबाखू मुक्ततेची शपथ दिली. स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यालयात देशभक्तीपर संगीत कवायत, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व सायकल रॅलीचे आयोजन केले होते.

प्रभात फेरीतील मुख्य आकर्षण तिरंगा ध्वज:- ध्वजारोहणानंतर गावात निघालेल्या प्रभात फेरीचे मुख्य आकर्षण ४०० फूट लांबीच्या तिरंगा ध्वजाचे ठरले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हा संयोजक रोहन भुजबळ, अभिजीत नरसाळे, कुणाल गोंडवाळ व भावेश बेलोटे यांनी त्याचे नियोजन केले होते.

विद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी आर. ओ. प्युरिफिकेशन सिस्टीम साठी निधी संकलन सुरू केले आहे. आजच्या स्वातंत्र्यदिनी ओम कॉम्प्युटरचे संचालक बापूसाहेब रांधवन यांनी ५००० रुपये, ग्रामपंचायत सदस्य दत्ताशेठ निवडुंगे यांनी ३३३३ रुपये, उद्योजक विक्रमशेठ झावरे यांनी २१०० रुपये देणगी दिली आहे.

विद्यालयातील इयत्ता दहावी बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ गावात मान्यवरांच्या शुभहस्ते पार पडला. या बक्षीस वितरणाचे वाचन अतुल सैद सर यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांचा देशभक्तीपर गीतावर सांस्कृतिक कार्यक्रम ही संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी थोर देणगीदार इंजिनियर बबनराव खिलारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहूशेठ जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, गावच्या सरपंच तथा प्रशासक सौ. अरुणाताई खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ व सर्व ग्रामपंचायत सदस्य, वि. का.सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे साहेब, व्हाईस चेअरमन मोहनराव रांधवन व सर्व सदस्य, माजी सरपंच शिवाजीकाका खिलारी, बाळासाहेब खिलारी, पंडितराव झावरे, किरण झावरे, पत्रकार बबनराव गायखे, शरदराव झावरे, दादा भालेकर, विनोद गायकवाड, गंगा धावडे, वसंतराव रांधवन, संजय मोरे, संतोष कोरडे, गणेश जगदाळे, श्रीनिवास शिंदे, सर्व पालक, ग्रामस्थ, विद्यालयातील सर्व सेवक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.

## एकता कॉलेजच्या यश ठुबेची एअर फोर्समध्ये तांत्रिक विभागात निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर येथील सावेडी उपनगरातील तपोवन रोड येथील एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या यश देवराम ठुबे या होतकरू विद्यार्थ्याची स्पर्धात्मक भरती प्रक्रियेतून भारतीय वायुसेनेच्या तांत्रिक विभागात निवड झाली आहे. वायुसेनेच्या तांत्रिक शाखेत देशभरातून आलेल्या उमेदवारांमधून कठीण लिखित परीक्षा, शारीरिक चाचणी आणि तांत्रिक विषयांचे टप्पे पार पाडावे लागतात, ज्यामध्ये आपल्या अभ्यासातील सातत्य व कौशल्याच्या जोरावर यश ठुबे याने हे यश मिळवत देशाच्या संरक्षणात आपले महत्त्वाचे योगदान निश्चित केले आहे. यश याचे वडील देवराम हे भारतीय सेनादलातून सेवानिवृत्त झालेले असून त्यांच्या योग्य मार्गदर्शना मुळे मला हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले.

यश ठुबे हा नगर तालुक्यातील अकोळनेर गावचा रहिवाशी असून नगर मध्ये शिक्षण घेत खुप मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर मिळवलेल्या या यशा बद्दल एकता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी कॉलेजच्या प्रा.कविता वाकडे, प्रा.ओंकार सुरग, प्रा.हर्षद कासार, दिपाली गिरी, ज्योती हारदे शिक्षक वृंद उपस्थित होते.त्याच्या या प्रेरणादायी कामगिरीने महाविद्यालयातील व परिसरातील तरुणांना देशसेवची नवी दिशा दाखवली आहे. असे श्री.मेहेत्रे यांनी सांगितले.

## देशभक्तीच्या सुरांनी रंगला अविस्मरणीय संगीत सोहळा

### ‘कर चले हम फिदा...’, ‘इतनी शक्ती हमें देना दाता...’ने रहेमत सुलतान सभागृह भारावले; टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कधी स्वरांमधून मातृभूमीचे स्मरण झाले, कधी शब्दांतून देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित झाली, तर कधी गझल-शायरीच्या नजाकतीने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला... ‘‘कर चले हम फिदा...’’, ‘‘इतनी शक्ती हमें देना दाता...’’ आणि ‘‘जिंदगी मौत ना बन जाए...’’ अशा अजरामर गीतांनी रहेमत सुलतान सभागृह भारावून गेले. प्रत्येक गीतानंतर ‘‘वाह... वाह...’’च्या उत्स्फूर्त दादेसह सभागृह टाळ्यांच्या गजरात न्हाऊन निघाले आणि रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मख़दूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन आणि गाता रहे मेरा दिल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने देशभक्तीपर गीतांची मैफिल, गीत-गझल, मुशायरा आणि कव्वालीचा सुरेल कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. देशभक्ती, संगीत आणि काव्याचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमाने रसिकांना अविस्मरणीय सांगीतिक अनुभव दिला. कार्यक्रमास धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते अनीसुर्रहेमान अन्सारी, रहेमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, आंतरराष्ट्रीय सुफी गायक पवन नाईक, युनायटेड सिटी हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. इमरान शेख, न्यू मॉडर्न कन्स्ट्रक्शनचे इंजि. इकबाल सय्यद, वेलनेस सेंटरचे शरफुद्दीन सर, एन.आर. फाउंडेशनचे सय्यद जाहीद,आंतरराष्ट्रीय कवयित्री डॉ. कमर सुरूर, संध्या मेढे,डॉ.शमा फारुकी, राजूभाई शेख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवातच देशप्रेमाची भावना जागविणारी ठरली. संजय भिंगारदिवे यांनी ‘‘भारत का रहनेवाला हूँ...’’ आणि ‘‘चढता सूरज धीरे धीरे...’’ या गीतांनी मैफलीत रंग भरला. त्यांच्या दमदार आवाजाने रसिकांची मने जिंकली आणि प्रत्येक कडव्यानंतर ‘‘वाह... वाह...’’ची उत्स्फूर्त दाद मिळत राहिली. डॉ.शैलेंद्र खंडागळे यांनी ‘‘ऐ मेरे प्यारे वतन...’’ सादर करताच वातावरणात मातृभूमीच्या प्रेमाची ओल दाटली. गीत संपताच रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट करीत ‘‘वाह... वाह...’’ अशी दाद दिली आणि संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले.मनोज कुमार यांनी ‘‘मेरे देश प्रेमियों...’’ या गीतातून देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या वीरांना स्वरांजली वाहिली. त्यांच्या भावपूर्ण सादरीकरणाला रसिकांनी मनमुराद दाद देत सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमून सोडले. सुनील हळगावकर यांनी ‘‘कर चले हम फिदा, जाने तन साथियों...’’ सादर करताच शहीदांच्या बलिदानाची आठवण जागी झाली. गीतातील प्रत्येक शब्द जणू राष्ट्रभक्तीची मशाल घेऊन आला आणि भारावलेल्या रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकाराला सलाम केला. प्रतीक्षा धारवाले यांनी ‘‘इतनी शक्ती हमें देना दाता...’’ या प्रार्थनात्मक गीतातून जीवनाला सद्बुद्धी, सामर्थ्य आणि सेवाभाव देण्याची प्रार्थना केली. त्यांच्या मधुर आवाजाने सभागृहातील वातावरण भावुक झाले.

## माथणी शाळेस लोकसहभागातून हायटेक विज्ञान गणित प्रयोगशाळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लोकसहभागातून अप्रवा एनर्जी प्रा.लि. या कंपनीकडून विज्ञान - गणित हायटेक प्रयोगशाळा सी .एस. आर. फंडातून लोकसहभाग म्हणून नुकतीच देण्यात आली असल्याची माहिती शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ आणि राहुल व्यवहारे यांनी दिली आहे.

या हायटेक प्रयोगशाळेचे उद्घाटन स्वातंत्र्यदिनी सरपंच ,उपसरपंच ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पालक व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी ही प्रयोगशाळा मिळणे कामी विशेष प्रयत्न केले .या प्रयोगशाळेत विज्ञान - गणिताचे विविध प्रयोग आहेत. या प्रयोगासाठी लागणारे सर्व साहित्य हे अत्याधुनिक आहे. प्रयोगामध्ये विज्ञान -गणित या विषयाचे डोळ्याचा नमुना, जलविद्युत ,फुफ्फुसाचा नमुना, पचनसंस्था ,फुलांचे अवयव, अन्नाचे पिरॅमिड ,ग्रहणे, पवनचक्की, जीवनचक्र, पेशीरचना, चेतासंस्था, पदार्थांच्या अवस्था ,अपूर्णांकाची संकल्पना, संख्यारेषा माहिती, कोनाचे प्रकार, त्रिकोण ओळख, चौकोनाचे गुणधर्म ,मूलभूत गणिती क्रिया, भौमितिक संकल्पना असे अनेक प्रयोग आहेत .हे विविध प्रयोग विद्यार्थ्यांना कृतिशीलपणे दाखवले जातात .विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रयोगाची मांडणी करून प्रयोग करून निष्कर्ष काढतात.

यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती, निरीक्षणशक्ती ,तर्कशक्ती, चिकित्सक वृत्ती ,विचारशक्तीला आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्याला चालना मिळत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन ,गणिती दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होत आहे.याबद्दल शिक्षणाधिकारी भास्कर पाटील ,संगमनेर डायटचे प्राचार्य राजेश बनकर गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते ,विस्तार अधिकारी मंदा जगताप ,केंद्रप्रमुख प्रल्हाद पवार,ग्रामस्थ आणि पालकांनी अभिनंदन केले आहे. संगमनेर डायटचे अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे यांनी या प्रयोगशाळेची पाहणी करून अभिनंदन केले.

# कल्याण रोड परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

## टोळक्याने फिरणाऱ्या मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करा; ॲड. युवराज शिंदे यांचे मनपा आयुक्तांना निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कल्याण रोड परिसरातील शिवाजीनगर, विद्या कॉलनी, समतानगर, आदर्शनगर, अनुसयानगर, भावना ऋषी सोसायटी आदी परिसरांमध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून, टोळक्याने फिरणाऱ्या कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सकाळ–संध्याकाळ फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या परिसरात मोकाट कुत्र्यांचा टोळक्याने वावर वाढला असून, नागरिकांचा तसेच शाळकरी मुलांचा कुत्र्यांकडून चावा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही मोकाट कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गांभीर्याने घेऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने केवळ तात्पुरती कारवाई न करता या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्यापूर्वी महापालिकेने तत्काळ पावले उचलावीत, अशी मागणी ॲड. युवराज शिंदे यांनी केली.

''मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त न केल्यास महापालिका प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी महापालिकेत मोकाट कुत्रे सोडण्याचा इशारा देण्यात येत आहे,'' असा इशाराही ॲड. युवराज शिंदे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत बालचमूंनी केले स्वातंत्र्यवीरांचे स्मरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक वर्ग,वि.ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा ,प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांमध्ये ८० वा स्वातंत्र्य दिन विविध उपक्रम व उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

स्वातंत्र्यवीरांच्या वेशभूषेत व हातात तिरंगा घेत भारत माता की जय ,वंदे मातरम च्या जयघोषात परिसरातून प्रभात फेरी काढली. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ.वैशाली भारदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी मा.श्रीम. रेखे मॅडम,श्री. चंद्रशेखर कुलकर्णी,श्री.किरण वैकर श्री. उमेशजी रेखे,श्री.महेशजी रेखे,ॲड.श्री उमेश नगरकर, श्री.उदयकुमार भणगे,प्राचार्य श्री.सुनील पंडित, सौ.भाळवणकर यांच्याउपस्थितीत सोहळा संपन्न झाला.

देशभक्तीपर गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संगीत कवायत, समूहगीत , देशभक्तीपर नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी मराठी , हिंदी व इंग्रजी भाषेतून भाषणे केली.

देशभक्ती ने ओथंबून गेलेल्या या सोहळ्यात शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लावली व याप्रसंगी शाळेला पाच टीव्ही सेट देऊन शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. श्रीम.कपाळे यांनी सूत्रसंचालन केले. तर श्री म्हस्के यांनी आभार मानले.

# विश्वविजेता कुमार शेजळ साहिल यांची अहिल्यानगर रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेला उपस्थिती

## एकाच वेळी २० खेळाडूंविरुद्ध खेळणार; घंगेकर चेस अकॅडमीतर्फे रविवार, २३ ऑगस्ट रोजी आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** घंगेकर चेस अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जी. एच. रायसोनी मेमोरियल अहिल्यानगर रॅपिड बुद्धिबळ स्पर्धे'चा उद्घाटन सोहळा रविवार, २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पाईपलाईन रोड, सावेडी येथील मोरया मंगल कार्यालयात होणार आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास जागतिक रॅपिड अँड ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेतील विजेता भारतीय राष्ट्रीय बुद्धिबळपटू कुमार शेजळ साहिल (वय २१) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

नायजेरियातील अबुजा येथे ७ ऑगस्ट रोजी संपलेल्या जागतिक रॅपिड अँड ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेत विजेतेपद मिळविलेल्या कुमार शेजळ साहिल यांच्यासोबत अहिल्यानगरमधील बुद्धिबळप्रेमींना प्रत्यक्ष खेळण्याची अनोखी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. साहिल हे एकाच वेळी २० खेळाडूंविरुद्ध सायमलटेनिअस बुद्धिबळ सामना खेळणार आहेत.

या एकदिवसीय रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत विविध वयोगटांसाठी सामने आयोजित करण्यात आले आहेत. ७ वर्षांखालील, ९ वर्षांखालील, १४ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, खुला तसेच महिला गट अशा विविध गटांचा समावेश असून विजेत्यांना रोख पारितोषिकांसह करंडक देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी सुमारे ४७ हजार ५०० रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.



या स्पर्धेला रायसोनी फाउंडेशन तसेच कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन, नागपूर यांचे सहकार्य लाभले आहे. विश्वविजेत्या बुद्धिबळपटूसोबत खेळण्याची आणि त्यांचा खेळ प्रत्यक्ष पाहण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल घंगेकर चेस अकॅडमीचे कौतुक होत आहे.

याबाबतची माहिती घंगेकर चेस अकॅडमीचे प्रशांत घंगेकर यांनी दिली. कुमार शेजळ साहिल यांच्यासोबत सायमलटेनिअस सामना खेळण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून इच्छुकांनी मनीष जसवाणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी प्रशांत घंगेकर– ९९२१३७७९८८, मनीष जसवाणी– ८८५५००२३३२, देवेंद्र ढोकळे– ९५११६५६०६३ यांच्याशी संपर्क साधावा.

# इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विकासात आणखी एक मानाचा तुरा

## मुलींच्या नवीन वसतिगृहाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**बेलवंडी–** ग्रामीण व दूरवरच्या भागातून तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींना सुरक्षित, सुसज्ज आणि शैक्षणिकदृष्ट्या पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बेलवंडी येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या नवीन मुलींच्या वसतिगृहाची उभारणी करण्यात आली आहे. या वसतिगृहाचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखाना लि., श्रीगोंदा फॅक्टरीचे चेअरमन तथा छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) शिवाजीराव नागवडे होते.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते यांनी राजेंद्र दादा नागवडे यांच्या नेतृत्वाखाली श्रीगोंदा तालुक्यात सहकार व शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या कार्याचे कौतुक केले. स्वर्गीय बापूंच्या आदर्श विचारांचा वारसा घेऊन तालुक्यात विविध सहकारी संस्था आदर्श पद्धतीने सुरू असून, शिक्षण क्षेत्रातही छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था आणि तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान या संस्थांच्या माध्यमातून सुमारे १६ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

''कर्तृत्ववान नेतृत्वातून इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये मुलींसाठी आदर्श वसतिगृहाची इमारत उभी राहिली आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थिनींना सुरक्षित निवासाची सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. या वसतिगृहामुळे ग्रामीण भागातील मुलींना तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी मोठी मदत होईल,'' असे गौरवोद्गार आमदार दाते यांनी काढले.

अध्यक्षीय भाषणात राजेंद्र दादा नागवडे यांनी नवीन वसतिगृहामुळे महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि सोयीस्कर निवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. विशेषतः ग्रामीण व दूरवरच्या भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार असून, उच्च व तांत्रिक शिक्षण घेण्याच्या त्यांच्या संधी अधिक व्यापक होतील. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वसतिगृह महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असे त्यांनी सांगितले. यावेळी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन मेघाताई संदीपराव ओटी तसेच श्रीगोंदा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष भगवानराव (आबा) पाचपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थेचे संचालक सुभाष काका शिंदे, प्रशांत दरेकर, विश्वनाथ दादा गिरमकर, भाऊसाहेब नेटके, विठ्ठलराव जंगले, श्रीनिवास गाडगे, शरदराव जगताप, दत्तात्रय काकडे, सावता नाना हिरवे, प्रवीण लबडे, लक्ष्मणराव रायकर, मारुती मामा पाचपुते, बंडू तात्या जगताप, भाऊसाहेब बरकडे, प्रा. सुरेशराव रसाळ, विठ्ठलराव भोईटे, आप्पासाहेब धायगुडे यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हाईस चेअरमन, ग्रामस्थ, पालक, महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी प्रास्ताविकातून नवीन वसतिगृहाची गरज आणि त्यामागील संस्थेची भूमिका स्पष्ट केली. ग्रामीण आणि दूरवरच्या भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींना सुरक्षित, सुसज्ज व शैक्षणिक वातावरणात निवासाची सुविधा मिळावी तसेच त्यांच्या तांत्रिक शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने वसतिगृहाची उभारणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन यांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा. ए. आय. हवालदार यांनी केले. अध्यक्षपदाची सूचना सिव्हिल विभागाचे विभागप्रमुख प्रा. एस. सी. नातू यांनी मांडली. उद्घाटन सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

**ग्रामीण विद्यार्थिनींसाठी मोठी सुविधा**

नवीन वसतिगृहामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित निवासाची सुविधा मिळणार असून, पालकांचीही निवास व सुरक्षिततेची चिंता दूर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वाढण्यासह त्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# आपल्या प्रभागात नागरी समस्या असल्यास त्वरित संपर्क करा - नगरसेविका रूपालीताई दातरंगे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** माझा प्रभाग स्वच्छ व सुंदर प्रभाग या अंतर्गत आपल्या प्रभागासह आपण राहतो त्या परिसरात कोणतीही नागरी समस्या असल्यास त्वरित आमच्याशी संपर्क करावा असे आवाहन प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका रूपालीताई संदीप दातरंगे यांनी नागरिकांना केले आहे. रूपालीताई संदीप दातरंगे यांनी आपला मोबाईल क्रमांक ९७६३१६१००१ प्रभागातील नागरिकांसाठी खुला केला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून आपल्या प्रभागात येणाऱ्या नागरी समस्या निदर्शनास आणून दिल्यास तात्काळ सोडवल्या जातील आणि नागरिकांना मूलभूत सर्व सुख सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून त्वरित उपलब्ध करून देणे ही नगरसेविका म्हणून माझी जबाबदारी आहे असे आवर्जून रूपालीताई दातरंगे यांनी सांगितले.



आपल्या प्रभागामध्ये तथा परिसरात कचरा संकलनासाठी घंटा गाडी नियमित येते का , आपल्याला पिण्याचे पाणी नियमित येते का, आपल्या परिसरात नियमित स्वच्छता कामगार येतात का,आपल्या परिसरातील स्ट्रीट लाइट व्यवस्थित चालू का अशा प्रकारच्या कोणत्याही नागरिक समस्या असल्यास त्या तात्काळ सोडवण्यात येतील, यासाठी नागरिकांनी मला ९७६३१६१००१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा. आपण सर्वांनी मोठ्या विश्वासाने मोठ्या मताधिक्याने महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मला निवडून दिले आता तुमच्या मूलभूत नागरी समस्या सोडवणे माझी जबाबदारी आहे यासाठी मी कटिबद्ध आहे.

# खेळाडूंच्या गगनभरारीला विश्वास गुंजाळ यांची अनोखी भेट

## खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची थाप; अवधूत ऑटो कंपोनंटकडून ५० स्पोर्ट्स टी–शर्टची भेट

दैनिक आकर्षण । केशव कातोरे

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत देवदैठणच्या सरपंच जयश्रीताई गुंजाळ व उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांच्या अवधूत ऑटो कंपोनंट, चिखली यांच्या वतीने खेळाडूंना ५० स्पोर्ट्स टी–शर्टची अनोखी भेट देण्यात आली. या उपक्रमातून खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले.

ग्रामीण भागातील ही प्रशाला असूनही येथील खेळाडू दरवर्षी जिल्हा, विभाग तसेच राज्यस्तरीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर शाळेचे तसेच श्रीगोंदा तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या कामगिरीला प्रोत्साहन मिळावे आणि भविष्यातील क्रीडा प्रवासासाठी त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने गुंजाळ परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून खेळाडूंसाठी सुमारे २० हजार रुपये किंमतीचे उत्तम दर्जाचे ५० स्पोर्ट्स टी–शर्ट देण्यात आले. एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने क्रीडा पोशाखाची भेट मिळाल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील भविष्यातील वाटचालीला नवी ऊर्जा मिळणार आहे.



### ग्रामीण खेळाडूंना सातत्याने मदत

**''आमची शाळा आणि खेळाडू ग्रामीण भागातील आहेत. प्राप्त परिस्थितीतही क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करत राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहोचत आहेत. या खेळाडूंना सातत्याने क्रीडा साहित्याच्या माध्यमातून मदत करण्याचा आमचा प्रयत्न असतो. यावेळीही खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांनी भविष्यात आणखी चांगली कामगिरी करावी, या हेतूने स्पोर्ट्स टी-शर्ट देण्यात आले.''**

**विश्वासभाऊ गुंजाळ, उद्योजक**
**अवधूत ऑटो कंपोनंट, चिखली**

यावेळी श्रीगोंदा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे, देवदैठणच्या सरपंच जयश्रीताई गुंजाळ, उपसरपंच रेश्मा कौठाळे, लक्ष्मीकांत दंडवते, प्रशालेचे मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, सुवर्णा ढवळे, सतीश वाघमारे, रामचंद्र वाघमारे, सर्जेराव कौठाळे, जयसिंग कौठाळे, नानाभाऊ वाघमारे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व खेळाडू उपस्थित होते.

खेळाडूंसाठी केलेल्या या मदतीबद्दल प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ व क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी सरपंच जयश्रीताई गुंजाळ व उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांचे आभार मानले. ग्रामीण भागातील खेळाडूंना आवश्यक क्रीडा साहित्य व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

(पान १ वरून)

# अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विकणाऱ्या १४ जणांवर गुन्हे

(रा. भिंगार) व राजू घोडके फरार आहेत. तोफखाना हद्दीत केलेल्या कारवाईत सद्दाम इसाक शेख (वय ३१) व हसनेन नदीम शेख (वय २०, रा. मुकुंदनगर) यांना पकडण्यात आले; तर आत्तु उर्फ आदीबखान पठाण व पाश्या उर्फ फिरदोसखान पठाण (रा. शेवगाव) फरार झाले. याप्रकरणी आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# नगर-मनमाड आणि ट्रम्प विधानावर डॉ.सुजय विखे पाटील ठाम!

विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली.

भारताला दरवर्षी सुमारे ९० लाख मेट्रिक टन डांबराची गरज भासते. त्यातील सुमारे निम्मे डांबर देशांतर्गत तेलशुद्धीकरण कारखान्यांमध्ये तयार होते, तर उर्वरित डांबर इराक, संयुक्त अरब अमिराती, इराण आणि बहरीन या देशांतून आयात केले जाते, असा दावा डॉ. विखे यांनी केला. युद्धजन्य परिस्थितीमुळे या देशांतून होणाऱ्या डांबराच्या आयातीवर मोठा परिणाम झाला असून, आयातीत सुमारे ७८ टक्क्यांची घट झाली असल्याचे त्यांनी सांगितले. दर ४८ हजारांवरून ८३ हजार ६५२ रुपये डांबराच्या दरवाढीची आकडेवारीही त्यांनी मांडली. फेब्रुवारी २०२६मध्ये प्रति मेट्रिक टन सुमारे ४८ हजार रुपये असलेला डांबराचा दर काही महिन्यांत वाढून ८३ हजार ६५२ रुपयांवर पोहोचला. त्यामुळे दरात सुमारे ७१ टक्क्यांची वाढ झाली आहे. डांबराच्या वाढलेल्या दरामुळे रस्त्यांच्या कामांवर परिणाम झाला असून, केंद्र सरकारने कंत्राटदारांना वाढीव दर देण्यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या वक्तव्याच्या समर्थनार्थ केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची पत्रे तसेच विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांतील वृत्तांचे दाखले त्यांनी दिले. 'विरोधकांनी आधी जागतिक घडामोडींचा अभ्यास करावा आणि मगच टीका करावी,' असा टोला त्यांनी लगावला. दारूसंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून झालेल्या वादावरही डॉ. विखे यांनी स्पष्टीकरण दिले. ते विधान मार्मिक आणि उपहासात्मक शैलीत केले होते; मात्र त्याचा विपर्यास करण्यात आला. कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर त्या वक्तव्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून ते शब्द मागे घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'निवडून दिलेल्यांनी हात वर केले म्हणून मला रस्त्यावर उतरावे लागले' नगर–मनमाड महामार्गाच्या दुरवस्थेवरून सुरू असलेल्या राजकीय टीकेलाही डॉ. विखे यांनी थेट प्रत्युत्तर दिले. 'माझे कोणाशीही वैयक्तिक वैर नाही. मात्र जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी हात वर केल्यामुळे आज निवडणुकीत पराभूत झालेल्या माणसाला जनतेच्या हितासाठी रस्त्यावर उतरून हे काम हाती घ्यावे लागत आहे,' असा घणाघात त्यांनी केला. रस्त्याच्या कामात दिरंगाई झाली असून काही ठिकाणी कामाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आहेत आणि रस्ता खचल्याच्या तक्रारीही खऱ्या असल्याचे त्यांनी मान्य केले. 'ठेकेदार माझा नातेवाईक नाही. मात्र जनतेला होणारा त्रास लक्षात घेऊन त्याच्याकडून दर्जेदार काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मी स्वतः घेतली आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

'ठेकेदारावर कारवाई केली तर रस्ता कोण पूर्ण करणार?' रस्त्याच्या कामाची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या विरोधकांनाही त्यांनी सवाल केला. 'राहात्यातील काही नेते चौकशी लावण्यासाठी आणि गुन्हे दाखल करण्यासाठी केंद्राला चार–चार पानी पत्रे पाठवत आहेत. ठेकेदारावर कारवाई होऊन तो काम सोडून गेला, तर उर्वरित रस्ता हे नेते स्वतः पूर्ण करून देणार आहेत का? याचे उत्तर त्यांनी आधी जनतेला द्यावे,' असे आव्हान त्यांनी दिले. केवळ पत्रे पाठवून आणि आरोप करून रस्त्याचा प्रश्न सुटणार नाही. जनतेला दर्जेदार आणि पूर्ण रस्ता हवा आहे. त्यामुळे काम थांबविण्याऐवजी ते पूर्ण करून घेण्याला प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

'रस्त्यासाठी आवाज उठवायला ग्रामपंचायत सदस्य असण्याची गरज नाही. मी या देशाचा करदाता नागरिक आहे. जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या करातून हा रस्ता होत आहे. या रस्त्यावर अपघातात जीव गमावणारे नागरिक माझे आहेत. त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून मला प्रश्न विचारण्याचा आणि काम पूर्ण करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे,' असे विखे म्हणाले.

'पराभवाने कोणी संपत नाही' आपल्या राजकीय भवितव्याबाबतही त्यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. 'एका निवडणुकीतील पराभवाने कोणी माजी होत नाही किंवा संपत नाही. निवडणूक पुन्हा होणार आहे. २०२९मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लागणारा निकाल सर्वांसमोर असेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जागतिक परिस्थितीमुळे अडचणी निर्माण झाल्या असतानाही नगर–मनमाड रस्त्याचे जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा डॉ. विखे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाला गती देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.